'टीसी' मारहाणप्रकरणी दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे तिकीट तपासणीदरम्यान रेल्वे कर्मचारी असल्याचा दावा करणाऱ्या प्रवाशाने कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना रविवारी घडली होती. रेल्वे पोलिसांनी या प्रकरणी ऋषिकेश पवार (२४) आणि निकिता पवार (२३) या दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तिकीट तपासणी कर्मचारी (टीसी) जिग्नेश भावसार हे रविवारी सायंकाळी सीएसएमटी स्थानकातील फलाट क्र. ५ आणि ६ जवळ तिकीट तपासणी करत होते. त्यांनी पवार दाम्पत्यास तिकीट तपासणीसाठी थांबवले. या वेळी ऋषिकेशने आपण रेल्वे कर्मचारी असल्याचा दावा केला. मात्र, भावसार यांनी ओळखपत्र किंवा नोकरीचा वैध पुरावा मागितला असता त्याने तो दाखवण्यास नकार दिला आणि तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. भावसार यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी ऋषिकेशने भावसार यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे.

उच्च न्यायालयाचा इम्रान खानला दिलासा

मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्धच्या निदर्शनात



सहभाग घेऊन परदेशी नागरिक कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी बॉलीवूड अभिनेता इम्रान खान याला परदेशी क्षेत्रीय नोंदणी कार्यालयाने (फॉरेनर्स रिजनल रजिस्ट्रेशन ऑफिस) बजावलेली नोटीस मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी २ नोव्हेंबरपर्यंत स्थगित केली. देश सोडण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या इम्रान याच्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठापुढे मंगळवारी सुनावणी झाली. त्या वेळी महान्यायाधिकर्ता तुषार मेहता या प्रकरणी युक्तिवाद करण्यासाठी उपलब्ध नसल्याचे अतिरिक्त महान्यायअभिकर्ता अनिल सिंह यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, प्रकरण २ नोव्हेंबर रोजी सुनावणीसाठी ठेवावे, अशी विनंती केली.

अल्पवयीन विद्यार्थिनीचा शिक्षकाकडून विनयभंग

मुंबई : विक्रोळी परिसरात शिकवणीच्या शिक्षकाने अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना सोमवारी समोर आली. याबाबत मंगळवारी विक्रोळी पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करत फहाद खान (२१) याला अटक केली आहे. पीडितेला त्रास होऊ लागल्याने तीने ही बाब तिच्या कुटुंबीयांना सांगितली. त्यानुसार मुलीच्या कुटुंबीयांनी याबाबत विक्रोळी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. या घटनेनंतर विक्रोळी परिसरात संतापाची भावना असून, नागरिकांनी विक्रोळी पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले.

लोकलचे दरवाजे बंद करणाऱ्यांवर कारवाई

मध्य रेल्वेकडून सोमवारच्या घटनेची दखल; कर्मचाऱ्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी



मुंबई : मध्य रेल्वेची लोकल सेवा सोमवारी दिवसभर विस्कळीत झाल्याने प्रवाशांना प्रचंड गर्दी आणि विलंबाचा सामना करावा लागला. त्यात ठाणे स्थानकात 'कर्मचारी विशेष लोकल'चे दरवाजे बंद ठेवून प्रवाशांना प्रवेश नाकारण्यात आल्याचा प्रकारही समोर आला. लोकलमध्ये मोजकेच कर्मचारी असताना सामान्य प्रवाशांना मात्र प्रवेश नाकारल्याने संताप व्यक्त होत आहे. या घटनेची रेल्वे प्रशासनाने दखल घेत, ध्वनिचित्रफितच्या आधारे कर्मचाऱ्यांची ओळख पटवून दोषींवर कारवाईचे संकेत दिले आहेत.

मध्य रेल्वेच्या कर्मचाऱ्यांसाठी 'कर्मचारी विशेष लोकल' चालवण्यात येते. सोमवारी सिग्नल यंत्रणा आणि ओव्हरहेड वायरशी संबंधित तांत्रिक बिघाड झाल्याने, मध्य रेल्वेची लोकल सेवा नऊ तासांहून अधिक काळ कोलमडली होती. त्यामुळे अशा वेळी सदर लोकलमधून सर्वसामान्य प्रवाशांना प्रवास करू देणे आवश्यक होते. परंतु ठाणे स्थानकातील फलाट क्र. २ वर कल्याणच्या दिशेने जाणारी कर्मचारी विशेष धीमी लोकल आली. त्यावेळी तिच्या एका डब्याचे दरवाजे आतून बंद करण्यात आले होते. फलाटावर थांबलेल्या प्रवाशांनी दोन ते तीन मिनिटे विनवणी करूनही आतून दरवाजा उघडण्यात आला नाही.

या घटनेची ध्वनिचित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले. प्रशासनाने याची गंभीर दखल घेत समाजमाध्यमांवरील ध्वनिचित्रफितीच्या आधारे संबंधित कर्मचाऱ्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू केले आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील नीला यांनी दिली.

ध्वनिचित्रफितीची पडताळणी

परळ येथून दुपारी ४ च्या सुमारास कल्याणच्या दिशेने धावणारी कर्मचारी विशेष लोकल ठाणे स्थानकात आली. या लोकलच्या डब्यात मोजकेच कर्मचारी बसले होते. तर, काही कर्मचारी आसनावर आरामशीर झोपले होते. समाजमाध्यमावरील याबाबतच्या ध्वनिचित्रफितीची पडताळणी करून दरवाजे बंद ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख निश्चित करून, दरवाजे बंद का ठेवले, याची चौकशी केली जाणार आहे. चौकशीत दोष सिद्ध झाल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे मध्य रेल्वे प्रशासनाने सांगितले.

गुन्ह्यातून मुक्त करण्यासाठी १५ कोटींच्या खंडणीची मागणी?

व्यावसायिकाचा पोलिसांवर आरोप

लोकसत्ता प्रतिनिधी

वसई : फसवणुकीच्या गुन्ह्यातून बाहेर काढण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी पोलीस अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाखाली १५ कोटी रुपये खंडणी मागितल्याचा आरोप विरारमधील व्यावसायिक आणि 'निदान हेल्थकेअर'चे संचालक डॉ. नितीन थोरवे यांनी केला. या गंभीर आरोपाची दखल घेत पोलीस आयुक्तांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत.

बोळींज पोलीस ठाण्यात मेस्त्री कुटुंबीयांची २० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जुलैमध्ये डॉ. थोरवे यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. हा तपास नंतर खंडणी विरोधी पथकाकडे वर्ग करण्यात आला. यादरम्यान, बोळींज पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक रुपेश दळवी आणि खंडणी विरोधी पथकाचे तपास अधिकारी यांनी वारंवार संपर्क साधून खटल्यातून सुटका करण्यासाठी १५ कोटींची मागणी केल्याचा आरोप डॉ. थोरवे यांनी केला आहे. याबाबत पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार केल्याचे त्यांनी सांगितले.

आरोपांबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त चौकशी करत असून त्यांचा जबाबही नोंदवण्यात आला आहे, असे गुन्हे शाखेचे नितीन पाटील यांनी सांगितले. तर 'माझा तपासाशी थेट संबंध नाही. गुन्हा दाखल केल्याच्या रागातूनच आमच्यावर खोटे आरोप होत आहेत', असे रुपेश दळवी यांनी स्पष्ट केले.

साहिलच्या आत्महत्येच्या तपासाबाबत असमाधानी!

न्यायालयात जाण्याचा, 'आयआयटी'बाहेर उपोषणाचा पालकांचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी



मुंबई : 'आयआयटी मुंबई'मध्ये शिक्षण घेत असलेल्या साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या आत्महत्येचा तपास असमाधानकारक पद्धतीने चालू असून त्यात अनेक त्रुटी आढळत आहेत. त्यामुळे आता उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावणार असल्याचे त्याच्या पालकांनी सांगितले. आझाद मैदानात २१ दिवस आंदोलन करूनही कोणीही दखल घेत नसल्याने आता थेट 'आयआयटी मुंबई'च्या प्रवेशद्वारावर उपोषण सुरू करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयआयटी मुंबईतील वसतिगृहात द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या साहिलने गेल्या महिन्यात १८ तारखेला आत्महत्या केली होती. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला, तरी तपास कूर्मगतीने सुरू असून त्यात अनेक त्रुटी असल्याचा आरोप साहिलचे पालक आणि त्यांचे वकील ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी मंगळवारी आझाद मैदानातील पत्रकार परिषदेत केला.

'आमच्या मुलाला जातीवाचक टोमणे मारून त्याचा छळ करण्यात आला. तसेच परीक्षेदरम्यान त्याला वर्गाबाहेर काढून त्याच्यावर दबाव टाकण्यात आला. त्या दिवसाच्या सीसीटीव्ही चित्रीकरणापैकी काही कॅमेऱ्यांचे फुटेज उपलब्धच नसल्याचे समोर येत आहे, यात नक्कीच काहीतरी काळेबेरे आहे,' असा आरोप पालकांनी या वेळी केला.

'आंदोलनाची दखलही नाही'

या प्रकरणात पोलिसांमधील काही सूत्रांकडून काही पुरावे छेडछाड करून अगदी वेगळ्या पद्धतीने प्रसारमाध्यमांपर्यंत पोहोचवण्यात आले आहेत. त्यामुळेच आम्ही तपास अधिकारी बदलण्याचीही मागणी केली होती. याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्रही लिहिले होते. मात्र आंदोलन सुरू होऊन २१ दिवसांपेक्षा जास्त काळ उलटूनही आमच्या आंदोलनाची आणि मागणीची दखल घेतलेली नाही, अशी खंत पालकांनी व्यक्त केली.

अभिनेता टायगर श्रॉफपूर्वी इम्रान हाश्मीही संभाव्य लक्ष्य

सलमान, आमिरच्या घरांची टेहळणी; पोलिसांचा दावा

मुंबई : टायगर श्रॉफवर हल्ला करण्यापूर्वी आरोपींनी अभिनेता सलमान आणि आमिर खान यांच्या निवासस्थानांची टेहळणी केली होती. तसेच इम्रान हाश्मी याच्या घराची टेहळणी करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यांना हाश्मी याचे घर शोधता आले नाही. त्यामुळे त्यांनी आपल्या सूत्रधारांना याबाबत कळविल्याचा दावा मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने केला आहे.

जुहू येथे १८ ऑक्टोबर रोजी टायगर श्रॉफच्या वाहनावर गोळीबार करण्यात आला. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा करीत आहे. तपासातील माहितीनुसार, सलमान खान हा लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या निशाण्यावर असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. आरोपींनी आमिर खानच्या निवासस्थानाचीही टेहळणी केली. मात्र तो दक्षिण मुंबईत स्थलांतरित झाल्याची माहिती नसल्याने त्यांना त्याचे घर शोधता आले नाही. त्यानंतर इम्रान हाश्मीच्या घराची टेहळणी करण्याची जबाबदारी आरोपींवर होती. मात्र, त्यांना यश आले नाही.

या प्रयत्नांनंतर आरोपींनी समाजमाध्यमांवरील चित्रफितींच्या माध्यमातून टायगर श्रॉफच्या हालचालींची माहिती मिळवली. तो दर रविवारी जुहू येथील पुष्पा नरसी मैदानावर फुटबॉल खेळण्यासाठी येत असल्याची माहिती आरोपींना मिळाली. त्यानंतर त्याला लक्ष्य करण्याचे ठरविण्यात आल्याचा पोलिसांचा दावा आहे.

रॅपिडो, ओला, उबर चालकांवरील कारवाईसाठी कायदा

मुंबई : रॅपिडो, ओला आणि उबर यांसारख्या ॲपआधारित प्रवासी वाहतूक सेवांमधील चालकांची पार्श्वभूमी, परवाने, कागदपत्रांची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन किंवा कायद्याने दखलपात्र ठरणारे गैरप्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी. या सेवांमधील चालकांना प्रभावीपणे कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी स्वतंत्र सुधारित कायदा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. माहीम परिसरात रॅपिडो बाइक टॅक्सी चालविणाऱ्या एका व्यक्तीविरोधात दहशतवादविरोधी पथकाने केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या वेळी सरनाईक यांनी वरील निर्देश दिले.

'तरुण वयातील अतिउत्साहापोटी चूक झाली असावी'

ऑपरेशन 'सिंदूर'विरोधी संदेशप्रकरणी विद्यार्थिनीविरुद्धचा गुन्हा रद्द

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : ऑपरेशन 'सिंदूर'बाबत समाजमाध्यमावरील संदेश पुन्हा प्रसारित केल्याप्रकरणी पुणेस्थित अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीविरुद्ध दाखल गुन्हा मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी रद्द केला. याचिकाकर्ती तरुण असून कदाचित अतिउत्साहापोटी तिच्याकडून ही चूक झाली असावी. ही बाब लक्षात घेऊन तिला सुधारण्याची संधी दिली पाहिजे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने तिच्याविरुद्धची फौजदारी कार्यवाही रद्द केली.

याचिकाकर्तीला यापूर्वीच कोठडीत राहावे लागले आहे. तरुण विद्यार्थिनीच्या आयुष्यात हा असा डाग आहे, जो सहजासहजी पुसला जाऊ शकत नाही. या प्रकरणात सरकारी पक्ष केवळ पोस्ट पुन्हा प्रसारित करण्याच्या कृतीवर अवलंबून आहे. त्याव्यतिरिक्त या घटनेशी संबंधित अन्य कोणताही पुरावा नाही. त्यामुळे तिच्याविरुद्धची फौजदारी कार्यवाही रद्द करण्यात येत असल्याचे न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले.

मूळची काश्मीरची रहिवासी असलेली ही विद्यार्थिनी पुणे विद्यापीठाशी संलग्न 'सिंहगड ॲकेडमी ऑफ इंजिनीअरिंग' या विनाअनुदानित महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात शिकत आहे.

'चूक लक्षात येताच ती सुधारली'

याचिकाकर्तीचा कोणताही गुन्हेगारी इतिहास नाही. संबंधित घटना केवळ पोस्ट पुन्हा प्रसारित करण्यापुरती मर्यादित आहे. चूक लक्षात आल्यानंतर तिने संबंधित पोस्ट स्वतःहून हटवली आणि त्याबद्दल दिलगिरीही व्यक्त केली होती. खटला चालवणे आणि शिक्षा देणे यांचा उद्देश केवळ दंड करणे नसून, त्यातून सुधारणा घडवून आणणे हाही आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

मजकूर अप्रिय वाटतो म्हणून खटला चालवणे चुकीचे

याचिकाकर्तीने प्रसारित केलेल्या पोस्टमधील मजकुरामुळे विविध धार्मिक समुदायांमध्ये अशांतता निर्माण होण्याची शक्यता होती. मात्र, एखादी गोष्ट अप्रिय वाटू शकते किंवा त्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात, या शक्यतेच्या आधारावरच कोणावर फौजदारी खटला चालवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सई परांजपे यांच्या 'अव्वल पाठशाळे'त संहितालेखनाचे धडे!

(पान १ वरून) केली जाणार आहे. नाटक वा चित्रपटांच्या संहितालेखनात रुची असणाऱ्या आणि या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या नवोदित पटकथालेखकांसाठी सईबाईंच्या या पाठशाळेतील असा 'वर्गपाठ' ही एक मेजवानी ठरणार आहे. तर, एखादा चित्रपट आपल्याला आनंद का देतो, दोन-अडीच तासांच्या प्रसंगमालिकेतील एखादा प्रसंग आपल्या मनात घर करून का बसतो, अशा प्रश्नांची उत्तरेही सामान्य प्रेक्षकांना या कार्यक्रमातून मिळतील.

'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट'चे हे दुसरे पर्व आहे. यंदाच्या सोहळ्यात साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक आणि कलाविषयक अशा अनेक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या कार्यक्रमांचा तपशील लवकरच 'लोकसत्ता'तून प्रसिद्ध होईल.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत

सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक व सहामाही अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार

(प्रति शेअर आकडेवारी वगळता, रकमा लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२६ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून, २०२६ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२६ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर, २०२५ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२६ लेखापरीक्षित
१.प्रचालनातून एकूण उत्पन्न	१३,१५४	१२,०५२	६,९२०	२५,२०६	१३,९७१	४२,५८९
२.कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	९,७८०	८,५९१	४,२६५	१८,३७१	८,९५८	३२,०७९
३.कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	९,७८०	८,५९१	४,२६५	१८,३७१	८,९५८	३२,०७९
४.कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	५,०८०	८,५९१	४,२६२	१३,६७१	८,९५५	३०,७४२
५.कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	५,०७०	८,५६३	४,२७४	१३,६५३	८,९३७	३०,७४४
६.समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७.राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षांच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	-	-	३,३५८
८.प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत व सौमिकृत (₹)	२.१२	३.५८	१.७८	५.७०	३.७३	१२.८१

*अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.

नोंद:

१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

२. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले असून, संचालक मंडळाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत त्यास मान्यता दिली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा

किंवा: https://www.mcxccl.com/disclosures ला भेट द्या.

स्थळ: मुंबई
दिनांक: २७ ऑक्टोबर २०२६

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
ऋषि नथानी
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी
DIN : 00999139

www.Larsentoubro.com

LARSEN & TOUBRO

LARSEN & TOUBRO LIMITED

Registered Office: L&T House, Ballard Estate, Mumbai 400 001 CIN: L99999MH1946PLC004768

EXTRACT OF STATEMENT OF UNAUDITED CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND SIX MONTHS ENDED SEPTEMBER 30, 2026

₹ Crore

	Particulars	Quarter ended			Six months ended		Year ended
		September 30, 2026 [Reviewed]	June 30, 2026 [Reviewed]	September 30, 2025 [Reviewed]	September 30, 2026 [Reviewed]	September 30, 2025 [Reviewed]	March 31, 2026 [Audited]
1	Revenue from operations	78749.94	67941.74	67983.53	146691.68	131662.45	285874.36
2	Profit before exceptional items and tax	7641.06	6922.26	6336.11	14563.32	12195.64	27698.25
3	Exceptional items [loss]	-	-	-	-	-	(1722.44)
4	Profit before tax (including exceptional items)	7641.06	6922.26	6336.11	14563.32	12195.64	25975.81
5	Net profit after tax including share in profit/(loss) of joint ventures/associates	5949.15	4988.03	4678.01	10937.18	8996.18	18953.88
6	Net profit after tax attributable to owners of the Company	5202.10	4122.85	3926.09	9324.95	7543.28	16083.99
7	Total comprehensive income attributable to owners of the Company	4878.17	4740.36	3658.01	9618.53	8432.50	16269.97
8	Paid-up equity share capital (face value of share: ₹ 2 each)	275.18	275.15	275.11	275.18	275.11	275.13
9	Other equity attributable to owners of the Company						109014.67
10	Earnings per equity share (EPS) (not annualised for the interim periods):						
	(a) Basic EPS (₹)	37.81	29.97	28.54	67.78	54.85	116.93
	(b) Diluted EPS (₹)	37.80	29.96	28.53	67.76	54.82	116.88

Notes:

(i) The Company reports its financial results on a quarterly basis. The above is an extract of the detailed format of quarterly consolidated financial results filed with the Stock Exchanges. The consolidated and standalone financial results in the detailed format are available on the Company's website viz. www.larsentoubro.com and on the websites of BSE (www.bseindia.com) and NSE (www.nseindia.com). The same can be accessed by scanning the QR code provided below.

(ii) The Company entered into a Share Purchase Agreement on April 29, 2026, with Hyderabad Metro Rail Limited, a Government of Telangana Enterprise for the divestment of its entire equity stake in its subsidiary, L&T Metro Rail (Hyderabad) Limited ["LTMRHL"]. The divestment process is underway and the estimated completion date for the transaction has been revised to December 31, 2026. Pursuant to this, the Assets & the Liabilities of the LTMRHL continues to be classified as "Held for Sale" as at September 30, 2026.

(iii) Figures for the previous periods have been regrouped/reclassified to conform to the classification of the current periods.

(iv) The above consolidated financial results of the Parent Company including its Subsidiaries, Associates & Joint Ventures have been prepared in accordance with the recognition and measurement principles laid down in the Indian Accounting Standards (Ind AS) as prescribed under section 133 of the Companies Act, 2013 read with the relevant rules issued thereunder and the other accounting principles generally accepted in India. These results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on October 27, 2026. The same have also been subjected to Limited Review by the Statutory Auditor.

Place : Mumbai
Date : October 27, 2026

for LARSEN & TOUBRO LIMITED

S. N. SUBRAHMANYAN
Chairman & Managing Director